# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

२५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com

जा. क्र. : तंशिविकापु/मा.अ./२००९/ ५६१८ दिनांक : 15 JUN 2009

प्रति

प्राचार्य
सर्व शासकीय व अनुदानीत अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय : माहितीच्या अधिकारांतर्गत मासिक विवरणपत्रे विहीत मुदतीत पाठविणेबाबत...**

संदर्भ : मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म रा मुंबई यांचे पत्र क्र ११/तंशिस/२०००९/७६४ दिनांक ०५/०५/२००९

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या ३ तारखेपर्यंत या कार्यालयास सादर करण्याबाबत वारंवार कळवून देखील माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मासिक विवरणपत्रे विहीत मुदतीत या कार्यालयास सादर करण्याबाबत आपणा कडून दिरंगाई होत आहे. आपणाकडून विवरणपत्रे विहीत मुदतीत प्राप्त होत नसल्यामुळे ती मा संचालक कार्यालयास या कार्यालयामार्फत विहीत मुदतीत पाठविली जात नाहीत.

या कार्यालयाकडून विहीत मुदतीत विवरणपत्रे संचालनालयास सादर न झाल्याने, संचालनालयाकडून ती शासनास सादर करण्यास विलंब होत असल्याने मा संचालकांना शासनाने कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.

आपणास पुन्हा कळविण्यात येते की सदर विवरणपत्रे आपण विहीत मुदतीतच या कार्यालयास पाठवावीत जेणेकरुन सदरची विवरणपत्रे संचालनालयास योग्य मुदतीत पाठविणे सोयीचे होईल. विवरणपत्रे पाठविण्यास विलंब झाल्यास होणा-या सर्व परिणामाची जबाबदारी सर्वस्वी आपलीच राहील यांची नोंद घ्यावी.

गो पं चौधरी

( गो पं चौधरी ),
प्र सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.